# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

-----------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक २७ जून, २०२४ / आषाढ ६, १९४६ ( शके )**

**(१) वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री**
**(२) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री**
**(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(४) कामगार मंत्री**
**(५) उद्योग मंत्री**
**(६) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(७) महिला व बालविकास मंत्री**
**(८) क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री**
**(९) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

-------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

-------------------------------------

**खारघर (नवी मुंबई) येथील मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे लेखापरिक्षण करणेबाबत**

**(१) * ८१८९६ श्री.महेश बालदी (उरण), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर (नवी मुंबई) येथील सेक्टर १० मधील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रुग्णांकडून प्रशासनामार्फत उपचारासाठी जादा बिल आकारत असल्यामुळे सदर हॉस्पिटलचे लेखापरिक्षण करून शासनाच्या अधिपत्याखाली आणण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हॉस्पिटलमार्फत आकारल्या जाणा-या लाखो रूपयांच्या बिलामुळे रूग्णांच्या नातेवाईकांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्यामार्फत पनवेल महानगरपालिकेकडे १ तक्रार प्राप्त झाली होती.

या तक्रारीचा पालिकेमार्फत तात्काळ निपटारा करुन रुग्णांस जादा आकारणी केलेल्या बीलाची रक्कम कमी करुन देण्यात आली आहे. “ यापुढे वाढीव बीलासंबंधी कोणत्याही रुग्णांची अथवा रुग्णांच्या नातेवाईकांची तक्रार प्राप्त झाल्यास रुग्णालयाविरुध्द महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी अधिनियम १९४९ नुसार कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल,” अशी मेडिकव्हर हॉस्पिटल्स प्रशासनाला पनवेल महानगरपालिकेच्या दि. ०५.०४.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे समज देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात प्रसुतीपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध (पीसीपीएनडीटी) कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत

**(२) * ८१३७४ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बंदी असतानाही अनेक जिल्हयात गर्भलिंग निदान आणि गर्भपात मोठया प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास येत असून सार्वजनिक आरोग्य विभागाने अलिकडेच एका पत्रात असे स्पष्टपणे नमुद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील २२ जिल्हयांमध्ये लिंग गुणोत्तराचे प्रमाणात एक हजार मुलांमागे मुलीचे प्रमाण घटल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जालना तसेच कोल्हापूर जिल्हयात मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण सर्वाधिक कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, छत्रपती संभाजीनगर येथे अवैध लिंगनिदान व गर्भपात रॅकेट सुरु असून सदर रॅकेटची पाळेमुळे कोल्हापूर, बीड, जालना व गेवराई या तालुक्यापर्यंत पोहोचलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन राज्यात गर्भलिंग निदान व गर्भपात रोखणे यासंदर्भातील कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच यातील दोषी डॉक्टर, गर्भपात सेंटर व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
CRS च्या Reporting नुसार २२ जिल्ह्यांत लिंग गुणोत्तर प्रमाण सन २०१९ ते २०२२ दरम्यान काही प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते.
(३) राज्यात CRS नुसार सर्वात कमी लिंग गुणोत्तर प्रमाण जालना जिल्ह्याचे ८५४ व कोल्हापूर जिल्ह्याचे प्रमाण ८७४ आहे.
(४) हे खरे आहे.
छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये अवैध गर्भलिंग निदान व गर्भपात सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.
(५) सदर प्रकरणी पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत आरोपींना पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले असून FIR क्र. १७७/२०२१ दाखल करण्यात आला आहे.
राज्यात “ आमची मुलगी ” या संकेतस्थळ आणि १८००-२३३-४४७५/१०४ या पीसीपीएनडीटी टोल फ्री हेल्पलाईन वरून प्राप्त तक्रारीचीं समुचित प्राधिकाऱ्यांमार्फत खातरजमा करुन दोषींवर कायदेशीर कार्यवाही

करण्यात येते. राज्यातील सर्व सोनोग्राफी केंद्रांची पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत नोंदणी करण्यात येते व जिल्हा/मनपा समुचित प्राधिकारी यांच्यामार्फत दर तीन महिन्यांनी तपासणी करण्यात येते. गर्भलिंग निदान करीत असल्याचा संशय आलेल्या सोनोग्राफी केंद्रावर बनावट गर्भवती (डिकॉय) महिलेच्या सहाय्याने स्टींग ऑपरेशन करुन खात्री करण्यात येते व दोषी आढळल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. तसेच खबरी बक्षीस योजनेंतर्गत पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्याबाबत माहिती देण्याऱ्या व्यक्तीस संबंधित केंद्राविरुध्द न्यायालयीन खटला दाखल झाल्यास रु. १,००,०००/- बक्षीस म्हणून दिले जातात. मा. न्यायालयामार्फत दोषारोपपत्र दाखल झालेल्या डॉक्टरांची नावे पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव राज्य वैद्यकीय परिषदेकडे पाठविण्यात येतात व दोष सिध्द झाल्यास डॉक्टरांची नोंदणी रद्द करण्यात येते. तसेच मुलींच्या जन्माचे महत्व पटवून देण्यासाठी टी.व्ही, रेडीओ, बॅनर, पोस्टर, रॅलीज, पथनाट्य, लोककला पथके, सामाजिक माध्यमे, इ. विविध प्रभावी प्रसार माध्यमांचा वापर करुन जनतेमध्ये वेळोवेळी जनजागृती करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय मनोरुग्णालयांमध्ये स्वयंपाकाच्या साहित्य खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(३) * ७९५१८ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय मनोरुग्णालयांमध्ये स्वयंपाकाच्या साहित्य खरेदीमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या शेवटच्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजारभावापेक्षा जास्त रकमेच्या निविदांना मंजूरी देऊन शासकीय निधीचा गैरवापर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर कामाची ई-निविदा Gem पोर्टलवर राबविण्यात आली होती. निम्नत्तम दरांची निविदा केंद्रीय खरेदी समितीकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माहिम (जि.पालघर) येथील ग्रामसेवकाने कोटयवधी रुपयांचा अपहार केल्याबाबत**

**(४) * ८०१८७ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिम (जि.पालघर) येथील ग्रामसेवकाने ग्रामसभेची परवानगी न घेता तसेच ग्रामपंचायतीत कोणताही ठराव झालेला नसतांना बांधकामांना बेकायदा परवानगी व बिनशेतीसाठी शिफारस करुन कोटयवधी रुपयांचा

गैरव्यवहार केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामसेवकाने ग्रामसभेचे इतिवृत्त पूर्ण न करता उपसरपंचाची त्यावर सही न घेता खोटे दाखले बनवून दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ग्रामसेवकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील माहिम ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या मासिक सभेचे इतिवृत्त अंतिम न करता बांधकाम ना-हरकत दाखला ग्रामसेवकाच्या स्वाक्षरीने दिल्याचे निदर्शनास आले आहे.

तथापि, बांधकामांना बेकायदा परवानगी व बिनशेतीसाठी शिफारस करून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) अंशत: खरे आहे.

ग्रामपंचायतीच्या मासिक सभेचे इतिवृत्त सरपंचांच्या स्वाक्षरीने अंतिम न करता बांधकाम ना हरकत दाखला ग्रामसेवकाने दिलेला आहे.

(३) सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी माहिम ग्रामपंचायतीस दिनांक १३.२.२०२४ रोजी भेट दिली. मासिक सभा इतिवृत्त अंतिम केले नसल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधित ग्रामसेवकाने दप्तरामध्ये फेरफार व हस्तक्षेप करु नये म्हणून त्याची अन्य ग्रामपंचायतीमध्ये सेवा वर्ग केली आहे. तसेच तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६.२.२०२४ रोजी चौकशी नेमण्यात आली. चौकशीचा अहवाल दिनांक २९.५.२०२४ रोजी प्राप्त झाला असून त्यानुसार संबंधित ग्रामसेवकास कारणे दाखवा नोटीस बजावली असून पुढील कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात हिमोफिलीया रुग्णांसाठी डे-केअर सेंटरची संख्या वाढविण्याबाबत

**(५) * ८१६७६ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमोफिलीया हा आनुवंशिक आजार असून या आजारामध्ये रक्त गोठविण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व घटकांच्या कमतरतेमुळे रक्तस्त्राव होत असून हा आजार वाय गुणसुत्राच्या दोषामुळे होत असल्याने प्रामुख्य पुरुष या आजाराने ग्रस्त असतात तर स्त्रीया या आजाराच्या वाहक असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात हिमोफिलीया आजाराचे जवळपास ४६ हजार ५०० रुग्ण असून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१३ पासून राज्यात हिमोफेलियाचे फक्त ९ डे-केअर सेंटरर्स सुरु असल्याने रुग्ण संख्येच्या तुलनेत उपलब्ध असलेली डे-केअर सेंटर कमी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिमोफिलीयाची डे-केअर सेंटर वाढविल्याने रुग्णांना मिळणा-या उपचारास वेग मिळेल तसेच इतर डे-केअर सेंटर्सवर पडणारा अतिरिक्त ताण कमी होईल या दृष्टीने शासनाने डे-केअरर्स सेंटरची संख्या वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे,

(२) हे अंशत: खरे आहे,

सद्य:स्थितीत राज्यात अंदाजे ५००० रुग्णांची नोंद आहे. राज्यात सन २०१३ पासून एकूण ९ हिमोफिलीया डे-केअर सेंटर्स कार्यान्वित होते. सद्य:स्थितीत सर्व जिल्हयात १ प्रमाणे नवीन २७ हिमोफिलीया डे-केअर सेंटर्स स्थापन करण्यात आलेली आहेत.

(३) २७ जिल्हयांमध्ये नवीन २७ हिमोफिलिया डे-केअर सेंटर्स स्थापली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड (पूर्व) येथील बांधकामाधीन इमारतीच्या सेप्टीक टँकमध्ये पडून कामगारांचा झालेला मृत्यू

**(६) * ८००२३ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड (पूर्व) येथील पिंपरी पाडा परिसरातील रत्नागिरी हॉटेल जवळ ‘रहेजा टॉवर’ या निर्माणाधीन इमारतीच्या शौचालयाच्या ४० फूट खोल टाकीत उतरलेल्या २ कामगारांचा दिनांक २४ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ‘रहेजा टॉवर’ ही खासगी इमारत असून बांधकामादरम्यान सेप्टिक टँक स्वच्छ करण्यासाठी ठेकेदाराने कामगार आणले असून, प्रत्यक्षात कामगारांना शौचालयाच्या टाकीत उतरविण्यास कायद्याने मनाई असतानाही खासगी कंत्राटदाराने कोणतीही सुरक्षात्मक साधन-सामुग्री पुरविण्यात आली नसल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच यापूर्वीही आंबूजवाडी, मालाड (पश्चिम) येथील सार्वजनिक सेप्टीक टँकमध्ये तीन कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना घडली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुसार सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्यासह मृत झालेल्या कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) व (२) खरे आहे,

रहेजा रेसिडेन्सी, पिंपरी पाडा, मालाड (पूर्व), मुंबईच्या कंपाऊंड मध्ये दि. २४ एप्रिल २०२४ रोजी सेप्टींक टँक साफ करण्यासाठी उतरलेल्या कामगाराचा मृत्यू झालेला असून व त्याला वाचवण्यासाठी सेप्टीक टँकमध्ये उतरलेल्या अन्य एका व्यक्तीचा मृत्यू झाला तर अन्य एक व्यक्ती जखमी झालेली आहे. सदर अपघाताच्या संबंधित जबाबदार व्यक्तींवर सुरक्षिततेची कोणतीही साधने न पुरवीली नसल्याची बाब समोर आली आहे.

(३) खरे आहे,

आंबुजवाडी, मालवणी गेट नं. १, मालाड (पश्चिम), मुंबई येथील सार्वजनिक सुलभ शौचालयाचा सेप्टींक टँक साफ करताना दि. २१.०३.२०२४ रोजी ०३ कामगारांचा मृत्यू झालेला आहे.

(४) (अ) पिंपरीपाडा, मालाड (पूर्व), येथील विकासकामार्फत मृत कामगाराच्या, बाहेरील मृत व्यक्तीच्या वारसदारांस व जखमी व्यक्तीच्या वारसदारांस प्रत्येकी रु.५ लाख प्रमाणे तात्काळ आर्थिक मदत देण्यात आली आहे. तसेच मयत कामगाराच्या वारसदारास नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत मा.कामगार न्यायालय तथा कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्त, मुंबई यांचेमार्फत कार्यवाही सुरू आहे.

सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने सुरक्षीततेची कोणतेही साधने न पुरवता सेप्टीक टँकमध्ये उतरवल्यामुळे, हयगय व निष्काळजीपणाचे कृत्य केल्याने भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ३०४-ए, ३३६, ३३८ अन्वये संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(ब) दि.२१/०३/२०२४ रोजी आंबुजवाडी, मालाड (पश्चिम), मुंबई येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सामंजस्य कराराद्वारे (M.O.U.) सुलभ शौचालयाच्या साफसफाईच्या देण्यात आलेल्या कामावरील ०३ कामगार मयत झाले आहेत. मयत कामगारांच्या वारसास नुकसान भरपाई देण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शा.नि.हामैउ-२०१९/प्र.क्र.२६८/अजाक, दि.१२.१२.२०१९ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पुढील कार्यवाही सुरु आहे.

सदर अपघातांच्या अनुषंगाने भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ३०४-ए अन्वये संबंधितांवर दाखल करण्यात आलेला आहे.

नमूद दोन्ही घटनांमध्ये झालेल्या कामगारांच्या मृत्यूसंदर्भात किमान वेतन अधिनियम, १९४८ व वेतन प्रदान अधिनियम, १९३६ या कामगार कायद्यांतर्गत संबंधिताविरुद्ध खटले दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात जलजीवन मिशन योजनेतर्गतच्या कामांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत**

**(७) * ७९४३५ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.दादाराव केचे (आर्वी), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.राजू कारेमोरे (तुमसर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.शिरीष चौधरी (रावेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन योजनेंतर्गत सुरु असलेली कामे अत्यंत संथ गतीने सुरु असल्यामुळे योजनेच्या अंमलबजावणी अभावी अनेक गावे, वाडया-वस्त्यांना नळपाणी योजना व पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेंतर्गत राज्यात अनेक ठिकाणी २५ टक्के सुध्दा कामे न होणे, झालेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असणे, निधीअभावी कामे प्रलंबित राहणे, काही ठिकाणी निधी अखर्चित राहणे, मंजूर कामे सुरु न होणे तसेच या कामांमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार देखील होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकडे संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे मोठया प्रमाणात योजना अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेबाबत अनेक स्थानिक लोकप्रतिनिधींनी, नागरीकांनी तक्रारी करुन तसेच मा.मंत्री महोदयांसमवेत बैठक घेवूनही तक्रारींची दखल शासनस्तरावरुन घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन उपरोक्त बाबींसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

दुष्काळ सदृश्य परिस्थिती तसेच पर्जन्यमानात घट यामुळे काही जिल्ह्यांमध्ये उद्भवाची पातळी कमी झाल्याने टंचाई असणाऱ्या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.
(२) हे खरे नाही.

काही जिल्ह्यांमध्ये उद्भवाचा प्रश्न, पुनर्वसन, फेरनिविदा, वनविभाग मंजूरी, योजनेमधील तांत्रिक बदल, उपांगासाठी जागेचे अधिग्रहण, स्थानिक अडचणी इ. कारणांमुळे ज्या योजनांची भौतिक प्रगती २५ टक्के पेक्षा कमी आहे अशा योजनांबाबत समस्यांचे तत्परतेने निराकरण करुन कामांना गती देण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात "लेक लाडकी" या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(८) * ७९९२६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात "माझी कन्या भाग्यश्री" या योजनेत सुधारणा करुन "लेक लाडकी" ही योजना माहे एप्रिल, २०२३

मध्ये सुरु केली असून या योजनेसाठी शासनाने रुपये १०० कोटीची तरतूद करुनही केवळ रु.१९ कोटी ७० लाख इतकाच निधी वितरीत केल्याचे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना राबविण्याचा मुख्य हेतू हा मुलींचा जन्मदर वाढविणे व मृत्यूदर कमी करणे, त्यांच्या शिक्षणास चालना देणे, कुपोषण कमी करणे, शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शून्यावर आणणे आणि बालविवाह रोखणे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२३ ते माहे जानेवारी, २०२४ या कालावधीतील ८९३९ मुलींचा जन्म झाला असून या योजनेअंतर्गत संबंधित विभागाकडे केवळ ११५६ मुलींचे अर्ज प्राप्त झाले त्यापैकी ५६१ मुलींना योजनेसाठी पात्र ठरविण्यात आले असून उर्वरित मुली अपात्र झाल्या असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेबाबत विभागाकडून जनजागृती करण्यात न येणे, तांत्रिक मार्गदर्शनाचा अभाव यामुळे अनेक अर्ज बाद होऊन अनेक लाभार्थी या योजनेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदर योजने अंतर्गत ठाणे जिल्ह्यात १५५० अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १३१० लाभार्थ्यांना पात्र ठरविण्यात आले आहे. उर्वरित २४० लाभार्थ्यांचे अर्ज त्यांच्या अर्जातील तांत्रिक त्रुटीमुळे अपात्र ठरविण्यात आले होते. तथापि, कागदपत्रांच्या पूर्तते अंती सदर अर्ज पात्र करणेबाबत कार्यवाही सुरू आहे.

(४) व (५) लेक लाडकी या योजनेचा शुभारंभ मा. पंतप्रधान यांच्या हस्ते करण्यात आला आहे. तसेच, राज्यातील सर्व जिल्ह्यात सदर योजनेच्या प्रचार प्रसिध्दीसाठी अंगणवाडी सेविका / मदतनीस यांच्यामार्फ़त घरोघरी या योजनेची माहिती देण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी, ग्रामपंचायत स्तरावर, शाळा, अंगणवाडी इ. ठिकाणी योजनेची प्रचार प्रसिध्दी करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संग्रामपूर ( जि.बुलढाणा ) येथे वाटप करण्यात आलेला पाकिटबंद पूरक पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याबाबत

**(९)** * **८०४६७ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संग्रामपूर ( जि.बुलढाणा ) येथे ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालकांना कुपोषणावर मात करण्यासाठी वाटप करण्यात येत असलेला पाकिटबंद पूरक पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) दै.लोकमत वृत्तपत्रातील बातमी व तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन आहाराचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. सदर तपासणीअंती अंगणवाडयांना पुरविण्यात आलेला घरपोच आहार खाण्यायोग्य असल्याचा तसेच, सदर आहारामध्ये निर्धारीत उष्मांक व प्रथिने असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झालेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लोटे (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपनीत घातक रसायन उडाल्याने दोन कामगार जखमी झाल्याबाबत**

**(१०)** * **७९६४० श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोटे (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथील औदयोगिक वसाहतीतील दिपक नोव्हाकेम कंपनीत घातक रसायन उडाल्याने दोन कामगार गंभीररित्या भाजल्याचे दिनांक ८ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुर्घटनेची माहिती कंपनीने लपवून ठेवल्याने संतप्त कामगारांचे नातेवाईक व स्थानिक ग्रामस्थांनी कंपनीविरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पोलीस प्रशासनाकडे मागणी करुनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जखमी कामगारांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच संबंधित कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०८/०३/२०२४ रोजी सदर कारखान्यात कँडल फिल्टरवर असलेल्या व्हेंट व्हाल्वला श्री. प्रतिक कांबळे या कामगाराचा धक्का लागल्याने कँडल फिल्टर वरील व्हेंट व्हॉल्वमधून फिनॉल मिश्रीत गरम पाणी २ कामगारांच्या अंगावर पडले. त्यामुळे दोन्ही कामगारांना किरकोळ भाजण्याच्या जखमा झाल्या होत्या. सदर अपघातामुळे कामगारांना कोणतेही शरीरिक अंपगत्व आलेले नाही. वैद्यकीय उपचारानंतर दोन्ही कामगारांना डिस्चार्ज देण्यात आलेला आहे. उपरोक्त कामगार दिनांक १८/०३/२०२४ व दिनांक २२/०३/२०२४ रोजी पुनश्च: कामावर रुजू झाले आहेत.
(२) हे खरे नाही.

दिनांक १०/०३/२०२४ रोजी अर्जदार श्री.मिलींद पांडुरंग गायकर, यांचा लोटे परशुराम एम.आय.डी.सी. मधील दिपक नोव्हाकेम कंपनीवर कारवाई करणेबाबतचा अर्ज प्राप्त झालेला होता. परंतू सदरची घटना घडल्यानंतर जखमी कामगार श्री.प्रतिक कांबळे, श्री.प्रशांत कदम यांना तात्काळ उपचाराकरीता कृष्णा हॉस्पीटल, कराड येथे दाखल करून उपचार करण्यात आलेले आहेत. त्यांनी झालेल्या घटनेबाबत आस्थापनेविरूध्द कोणतीही तक्रार नसल्याचे जबाबात लिहून दिल्याने व्यवस्थापनाविरूध्द कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

परंतू या नंतरही संबंधीत कामगारांनी स्वतः पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यास पुढील कार्यवाही तात्काळ करण्यासाठी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, खेड यांना पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांच्याकडून सुचना दिलेल्या आहेत.

(३) याप्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे. तसेच सरकारी कामगार अधिकारी यांनी दि. १४/०६/२०२४ रोजी भेट देण्यात आली आहे. सदर घटनेतील जखमी कामगारांचा रुपये ९८,६६१/- इतका वैद्यकीय खर्च व्यवस्थापनाने केलेला आहे. वैद्यकीय रजेच्या कालावधीतील कामगारांचा संपूर्ण पगार रुपये १४१८४/- व्यवस्थापनामार्फत अदा करण्यात आलेला आहे. व्यवस्थापनाकडून श्री. प्रतिक कांबळे यांना रुपये ४०,०००/- व श्री. प्रशांत कदम यांना रुपये ३५,०००/- असे एकूण रुपये ७५,०००/- सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे. दोन्हीही कामगार राज्य विमा योजने अंतर्गत नोंदणीकृत असून सदर योजनेच्या अंतर्गत वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ततेपोटी मिळणारी रक्कम व रजा कालावधीतील वेतन नियमानुसार सदर कामगारांना मिळणार असल्याचे व्यवस्थापनाने कळविले आहे.

उपरोक्त प्रकरणी कारखाना भोगवटादारास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.तसेच भोगवटादाराविरुध्द पुढील कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरिवली (पश्चिम) येथे इमारतींच्या दुरुस्ती/बांधकामावेळी कामगारांचा झालेला मृत्यू

**(११) * ७९४१३ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (पश्चिम) येथील सोनिवाडी परिसरातील कल्पना चावला चौकात बांधकाम सुरू असलेल्या ‘सोनी आर्केड’ या इमारतीची बांबूची परांची कोसळून झालेल्या दुर्घटनेत तीन कामगारांचा मृत्यू आणि एक कामगार गंभीर जखमी झाल्याचे दिनांक १२ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोरिवली पोलीसांच्या हद्दीतील कोरा केंद्राजवळील आर.एम.भट्ट मार्गावरील ऑरिएट हया निर्माणाधीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून पडून श्री.चंदनकुमार या कामगाराचा दिनांक २८ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला हे ही खरे आहे काय ,

(३) तसेच, कस्तुरबा मार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बोरीवली कार्टर रोड क्र.२ वरील सुरभी कन्स्ट्रक्शनच्या इमारतीवरून पडून श्री.प्रकाश संतोष माझी या कामगाराचा दिनांक २८ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी करुन संबंधित विकासक, कंत्राटदार व अन्य दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच सदर दुर्घटनेतील मृत व जखमी कामगारांना आर्थिक नुकसान भरपाई अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

मे. नेक्स्ट स्पेस रिअल्टी या आस्थापनेच्या ओरीएट, कोरा केंद्र मैदानाजवळ, आर.एम. भट्टड मार्ग, बोरीवली (प.), मुंबई-९ या बांधकामाच्या ठिकाणी दिनांक २५.०३.२०२४ रोजी दुसऱ्या मजल्यावर काम करीत असताना अपघात होऊन एका कामगाराचा मृत्यू झालेला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मे. सोनी ॲण्ड असोसिएट, मे. नेक्स्ट स्पेस रिअल्टी व मे.सुरभी कन्स्ट्रक्शन या बांधकामाच्या ठिकाणी झालेल्या अपघाताच्या अनुषंगाने क्षेत्रीय सरकारी कामगार अधिकारी यांनी प्रत्यक्ष भेट देऊन किमान वेतन

अधिनियम, १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६, कंत्राटी कामगार अधिनियम १९७०, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत मुख्य मालक व कंत्राटदार यांना निरिक्षण शेरे पारित केले असून मुख्य मालक व कंत्राटदार यांचेविरुद्ध मा. न्यायालयात खटले दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच बांधकामाच्या ठिकाणी सुरक्षिततेची पुरेशी साधने उपलब्ध करुन दिली नसल्याने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या नियम २६३ अन्वये मे. सोनी ॲण्ड असोसिएट, मे. नेक्स्ट स्पेस रिअल्टी व मे.सुरभी कन्स्ट्रक्शन यांना अनुक्रमे दि.२२.०३.२०२४ व दि.१९.०६.२०२४ रोजी मनाई आदेश पारित केलेले आहेत.

तसेच मे. सोनी ॲण्ड असोसिएट, मे. नेक्स्ट स्पेस रिअल्टी व मे.सुरभी कन्स्ट्रक्शन या बांधकाम साईटवरील झालेल्या अपघाताशी संबंधित कंत्राटदार/साईट इंजिनियर/प्रोजेक्ट मॅनेजर यांचेविरुद्ध अनुक्रमे १. भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३०४-ऐ, कलम ३३८ अन्वये गुन्हा (FIR) क्र. ०१७६/२०२४, दि. १२.०३.२०२४ रोजी बोरिवली पोलीस ठाणे, मुंबई, २. भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३०४-ऐ अन्वये गुन्हा (FIR) क्र. ०२२२/२०२४, दि. २६.०३.२०२४ रोजी बोरिवली पोलीस ठाणे, मुंबई व ३. भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३०४-ऐ, कलम ३४ अन्वये गुन्हा (FIR) क्र. ०४२७/२०२४, दि. २८.०५.२०२४ रोजी बोरिवली पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा दाखल झालेला आहे.

(५) मे. सोनी ॲण्ड असोसिएट, या बांधकामास बजावण्यात आलेल्या मनाई आदेशाविरुद्ध विकासक/कंत्राटदाराने अधिनियमातील तरतुदीनुसार मुख्य निरिक्षक यांच्याकडे अपिल दाखल केले असून त्याबाबत सुनावणी होवून उपकंत्राटदार यांनी त्यांच्या कामगारांसाठी घेतलेल्या विमा पॉलिसीची रक्कम मंजूर होईपर्यंत उपकंत्राटदार यांच्याकडून मयत ०३ कामगारांच्या वारसदारांना देय होणाऱ्या नुकसान भरपाई रकमेच्या अनुषंगाने रु. ४३,२५,०००/- इतक्या रकमेची बँक गँरेंटी जमा करुन घेण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक मयत कामगारांच्या वारसदारास तातडीची मदत म्हणून रु. १,००,०००/- अदा करण्यात आलेले आहे.

मे.नेक्स्ट स्पेस रिॲल्टी या मुख्य मालकाच्या कंत्राटदाराने त्यांच्याकडे काम करीत असलेल्या कामगारांसाठी विमा उतरविण्यात आलेला असून मयत कामगाराच्या वारसदारांना अपघात नुकसान भरपाई देणेबाबत मा.कामगार न्यायालय तथा कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्त, वांद्रे, मुंबई यांच्या कार्यालयास दिनांक १९.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. मयत कामगाराच्या वारसदारास तातडीची मदत म्हणून कंत्राटदारामार्फत रु.१,००,०००/- अदा करण्यात आलेली आहे.

मे.सुरभी कन्स्ट्रक्शनच्या मुख्य मालकाने त्यांच्याकडे काम करीत असलेल्या कामगारांसाठी विमा उतरविण्यात आलेला असून मयत कामगाराच्या वारसदारांना अपघात नुकसान भरपाई देणेबाबत मा.कामगार न्यायालय तथा कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्त, वांद्रे, मुंबई यांच्या कार्यालयास दिनांक १९.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. मयत कामगाराच्या वारसदारास तातडीची मदत म्हणून मुख्य मालकाने रु.१,५०,०००/- अदा केलेले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पाणी टंचाईची समस्या सोडविण्याबाबत

**(१२) * ७९५५७ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक भागात मोठया प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाली असून लोकांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोठया प्रमाणात भुजल पातळी खालावत चालली असून धरणांमधील पाणीसाठा देखील कमी होत असल्याने पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक भागात टँकरने पाणी पुरवठा करावा लागत असून, काही गावांना टँकरने दूषित तर काही ठिकाणी आवश्यकतेपेक्षा कमी प्रमाणात टँकरने पाणी पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडे वेळोवेळी निवेदने दिल्याने शासनस्तरावर पाणीटंचाईच्या प्रश्नांवर बैठक होवूनही अद्यापर्यंत यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पाण्याच्या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून राज्यातील दुर्गम भागांपर्यंत पाणी पुरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात कमी पर्जन्यमानामुळे अनेक भागात पाणी टंचाई निर्माण झाली असून काही ठिकाणी पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यात सन २०२३-२४ मध्ये कमी पर्जन्यमानामुळे धरणातील पाणीसाठा कमी झाल्यामुळे काही भागातील भुजल पातळी खालावत चालली आहे. काही ठिकाणी पाण्याचा प्रश्न गंभीर झालेला आहे.

(३) टँकरद्वारे शुध्द व योग्य प्रमाणात पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(४) व (५) राज्यात दरवर्षी होत असलेली पाणी टंचाई दूर करण्यासाठी केंद्र शासन व राज्यशासनाद्वारे जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत ५५ लिटर दरडोई दरदिवशी पाणी उपलब्ध करून देण्याकरिता नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. तसेच मंजूर टंचाई कृती आराखड्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन पाणी टंचाई निवारणार्थ विंधन विहिरी/कुपनलिका घेणे, नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे, तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे, टँकरने / बैलगाडीने पाणी पुरवठा करणे, खाजगी विहीर अधिग्रहण करणे, विहीर खोल करणे/ गाळ काढणे, बुडक्या घेणे, इ. उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

राज्यात यावर्षी अत्यल्प पर्जन्यमान झाल्यामुळे सद्य:स्थितीत २५ जिल्हयातील ३२७८ गावे व ८२८७ वाडयांमध्ये शासकीय ९९ व खाजगी ३८६७ अशा एकूण ३९६६ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

राज्यातील टंचाई क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याची निकड विचारात घेऊन टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यास मान्यता देण्याचे अधिकार आवश्यकतेनुसार संबंधित उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यांना दिनांक २० एप्रिल, २०२२ रोजी च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील औंध जिल्हा रुग्णालयातील गैरप्रकार रोखण्यासह अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(१३) * ७९५१० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील औंध जिल्हा रुग्णालयातील सिटी स्कॅन, एम.आर.आय. मशीन्स दोन महिन्यांपासून कार्यान्वित नसून सहापैकी दोनच शीत पेटया कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, डॉक्टरांची कमतरता, उपलब्ध डॉक्टर व परिचारिकांचा निष्काळजीपणा, सुरक्षा रक्षकांची कमतरता यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चुकीच्या रक्त गटाचा पुरवठा, कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामकाजाचे वाटप व वैद्यकीय प्रमाणपत्र देणेकामी तसेच रुग्णालय परवाना नुतनीकरणाच्या गैरव्यवहारात रुग्णालय प्रशासनाचा सहभाग असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णालयात अद्ययावत सोई-सुविधा, वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करणेबाबत तसेच रुग्णालयातील गैरप्रकार रोखण्यासह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत : (**१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, पुणे बाह्ययंत्रणेद्वारे सिटी स्कॅन, एम.आर.आय. इत्यादी सेवा पुरविण्याबाबतचा करार समाप्त झाला असून नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

नवीन कंत्राटदाराकडून जागेची तपासणी करुन त्याकरीता आवश्यक असलेली यंत्रसामग्री बसविण्याचे

काम सद्यस्थितीत सुरु आहे. मशीन स्थापित करण्याबाबतचे काम पूर्ण होताच जिल्हा रुग्णालयातून रुग्णांना सिटी स्कॅन, एम.आर.आय. सेवा उपलब्ध होणार आहे.

तसेच जिल्हा रुग्णालय, पुणे येथे शवागारगृहात उपलब्ध असलेल्या ६ शित पेटया पैकी ४ शीतपेटयांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने बंद होत्या. सदर शीतपेटया तात्काळ दुरुस्त करुन घेऊन त्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालयातील वर्ग-१ व वर्ग-२ ची एकूण ५५ पदे मंजूर असून त्यापैकी ४७ पदे भरलेली आहेत. तसेच वर्ग-३ च्या शुश्रूषा संवर्गाची एकूण मंजूर पदे १५९ आहेत. त्यातील भरलेली १५२असून त्यामार्फत रुग्णांना आरोग्य सेवा देण्यात येते आहे.

शासनाच्या निकषाप्रमाणे ३०० खाटांच्या जिल्हा रुग्णालय, पुणे या रुग्णालयात एकूण २१ सुरक्षा रक्षकांची पदे मंजूर केलेले आहेत. त्यानुसार २१ पदे सुरक्षा रक्षकाची कार्यान्वित असून त्यामार्फत सेवा घेण्यात येत आहेत.

जिल्हा रुग्णालयातील अधिपरिचारिकेकडून रुग्णास चुकीच्या रुक्त गटाचा पुरवठा केलेल्या अधिपरिचारिकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामकाजाचे वाटप हे रुग्णालयाची आवश्यकता व निकड लक्षात घेऊन पदनिहाय कामकाज वाटप करण्यात आलेले त्यांचेमार्फत विहित पद्धतीनेच वैद्यकीय तपासणीअंती प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात येत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात जिल्हास्तरावर आरोग्य विभागाच्या रुग्णालयात “डे-केअर केमोथेरपी केंद्र” सुरु करणेबाबत**

**(१४) * ७९६९५ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१९ मध्ये कर्करोग रुग्णांच्या केलेल्या सर्वेक्षणामध्ये एक लाख सोळा हजार कर्करोग रुग्णांची नोंद झाली असून ग्रामीण भागात कर्करोगाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाने राज्यात कर्करोग निदान उपचारासाठी विविध योजना राबवण्याचा निर्णय घेवून टाटा कॅन्सर सेंटर सोबत सामंजस्य करार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने राज्यात जिल्हास्तरावर आरोग्य विभागाच्या रुग्णालयात ‘डे-केअर केमोथेरपी केंद्र’ सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सध्या अमरावती, गडचिरोली, भंडारा, सिंधुदुर्ग, सातारा, नाशिक, पुणे, जळगांव, अकोला, वर्धा, रत्नागिरी,बीड व नंदुरबार अशा १३ ठिकाणी केमोथेरपीचे सेंटर सुरु करण्यात आले असून उर्वरित २२ जिल्हयामध्ये अद्यापही सदरहू यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संपूर्ण राज्यात जिल्हास्तरावर आरोग्य विभागाच्या रुग्णालयात डे-केअर केमोथेरपी केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१),(२) व (३) हे खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत सहा जिल्हयांमध्ये डे-केअर सेंटर कार्यान्वित आहेत.

(५) उर्वरित जिल्हा रुग्णालय स्तरावर संबंधित जिल्ह्यात डे-केअर केमोथेरपी सेंटर सुरु करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**छत्रपती संभाजीनगर येथील मे. सनशाईन एंटरप्रायजेस कंपनी, वाळुज, औद्योगिक वसाहत, येथे भीषण आग लागल्याबाबत**

**(१५)** * **८०१४८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील मे. सनशाईन एंटरप्रायजेस कंपनी, वाळुज औद्योगिक वसाहत येथे हातमोजे बनविणाऱ्या कंपनीस दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास भीषण आग लागून ६ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेमध्ये किती आर्थिक व जीवितहानी झाली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृत व जखमी कामगारांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) मे.सनशाईन एंटरप्रायजेस, सी-२१६, एमआयडीसी वाळुज, छ.संभाजीनगर या आस्थापनेत दिनांक ३१/१२/२०२३ रोजी रात्री ०१.३० च्या सुमारास आग लागुन ०६ कामगारांच्या मृत्यू झाला. तसेच ठेकेदार स्वतः, त्याची पत्नी व दोन लहान मुलांसह इतर ०७ कामगार अशाप्रकारे एकुण ११ व्यक्ती सुखरूप बाहेर पडल्या.

सदर आगीच्या घटनेमध्ये कारखान्यातील टिनाचे शेड, इलेक्ट्रीकल वायरिंग, साठवलेले हॅण्डग्लोज,कच्चा माल,स्टिचिंग मशीन, छोटया नेंटिग मशीन तसेच रेकॉर्ड जळाले.

(३) सदर कारखान्यात २० पेक्षा कमी कामगार असल्याने सदर आस्थापनेस कारखाने अधिनियम, १९४८ मधील तरतुदी लागू नाहीत. तथापि, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत सदर आस्थापनेची तपासणी करण्यात आलेली आहे.

सदर दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक मदत देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत मा. नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, छत्रपती संभाजीनगर यांना सुचना देण्यात आली आहे. मा. कामगार न्यायालयात सद्या सदर दावा प्रलंबित असून मृतांचे वारसदार निश्चित करण्याची कार्यवाही मा. नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय यांचेकडून सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आरोग्य खात्याला रुग्णवाहिका (अँब्युलन्स) पुरविण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेबाबत

**(१६) *८०३१९ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य खात्याअंतर्गत रुग्णवाहिका (अँब्युलन्स) खरेदी प्रकरणी केंद्रीय दक्षता आयोगाने घातलेल्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करुन निविदा प्रक्रिया राबविल्याने सुमारे ८ हजार कोटींचा गैरव्यवहार करण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने रुग्णवाहिका खरेदीबाबतचा अध्यादेश माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये काढला असून या सेवेसाठी पिंपरी-चिंचवड येथील कंपनीला आराखडा तयार करण्याचे काम देण्यात आले असून रु.५७७ कोटींचा भांडवली व रु.६९६ कोटींच्या वार्षिक आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मात्र या अध्यादेशात दुरुस्ती करुन दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी हे काम रुग्णवाहिका पुरविण्याचा कोणताही अनुभव नसलेल्या मे. सुमित फॅसीलिटीज लिमिटेड, मे.बी व्हि जी इंडिया लिमिटेड व मे.एसएसजी ट्रान्सपोर्ट सॅनिटेरियो एस एल या कंपनीस देवून रु.१११६ कोटी इतक्या भांडवली खर्चास व रु.८०७ कोटी इतक्या आवर्ती खर्चास वाढीव मान्यता दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक १५ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयात दिनांक १३ मार्च, २०२४ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत यास मान्यता दिल्याचे नमूद करण्यात आले, मात्र दिनांक १३ मार्च, २०२४ रोजी मंत्रीमंडळ बैठकीत अधिकृतरित्या प्रसारित निर्णयामध्ये रुग्णवाहिका खरेदीस मान्यता देण्याच्या निर्णयाचा उल्लेख नव्हता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन ही निविदा प्रक्रिया रद्द करुन झालेल्या गैरव्यवहारात जबाबदार कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्यातील आपत्कालीन वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी नवीन सेवा पुरवठादाराची नियुक्ती करण्याकरिता शासन निर्णय क्र.ईएमएस-२०२३/प्र.क्र.०२/आरोग्य-३ दि.०४ ऑगस्ट, २०२३ नुसार प्राप्त प्रशासकीय मान्यता देण्यात आली हे खरे आहे. मात्र सदर आराखडा तयार करण्यासाठी पिंपरी- चिंचवड येथील कंपनीला काम देण्यात आले हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

रुग्णवाहिकेचे अद्यावतीकरण केल्याने सुधारित प्रशासकीय मान्यता निविदा समितीच्या निर्णयानुसार करण्यात आली हे खरे आहे. मात्र सदर निविदा ही नियमानुसार संपूर्ण प्रक्रिया करून तीन भागीदारांच्या consortium ला देण्यात आली.

(४) महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसाद सेवा प्रकल्पाकरीता सेवा पुरवठादाराची नेमणूक करण्याकरीता निविदा समितीने केलेल्या शिफारशी व दिलेल्या अभिप्रायांचा विचार करुन अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. मुख्यमंत्र्यांना देण्याचा मा. मंत्रिमंडळाने निर्णय घेतला.

त्यानुसार, सविस्तर प्रस्तावास मा. मुख्यमंत्री महोदयांची मान्यता घेऊन सुधारित प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आला.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयात अद्यायावत आरोग्य सेवा पुरविणेबाबत

**(१७) * ७९७०७ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा हा आदिवासीबहुल भाग असून दुर्गम भागात राहणाऱ्या नागरिकांची संख्या मोठया प्रमाणात असून तेथे पुरेशा आरोग्य सेवेअभावी रुग्णांची गैरसोय होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर येथे आरोग्य सेवेसाठी मंजूर पदांची संख्या कमी असणे, उपलब्ध पदांवर भरती न होणे, वैद्यकीय अधिकारी, तंत्रज्ञ व अत्याधुनिक यंत्रसामुग्रीची कमतरता इत्यादी अनेक कारणास्तव रुग्ण वैद्यकीय सुविधेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी बाजूच्या राज्यात जावे लागत असून काही ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून रुग्णांना तपासणी न करता जोखमीची प्रसूती वा अधिक उपचाराचे कारण देत रुग्णांना गुजरात राज्यातील बलसाड किंवा केंद्रशासित सिल्वासा येथील विनोबा भावे रुग्णालयाकडे संदर्भित केले जात असून तेथे महाराष्ट्र शासनाद्वारे मिळणाऱ्या वैद्यकीय सुविधेचा लाभ घेता येत नसल्याने रुग्णांना स्वखर्चाने उपचार घ्यावे लागतात, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, मोखाडा तालुक्यातील गर्भवती आदिवासी महिलेला वेळेत उपचार न मिळाल्याने दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास सदर महिलेचा बाळासह मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन पालघर जिल्हयात अद्ययावत आरोग्य सेवा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

पालघर जिल्हयात ४६ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३०६ उपकेंद्र कार्यरत असून त्यामार्फत ग्रामीण भागातील जनतेस आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे. तसेच नवीन ९ प्राथमिक आरोग्य केंद्र व २५ उपकेंद्र मंजूर आहेत. पालघर जिल्हयात गाव/पाडा स्तरावर २४७७ पाडा स्वयंसेवक व २२१७ आशा कार्यरत आहेत.
(२) हे खरे नाही.

पालघर जिल्हयात एकूण २०७७ पदे मंजूर असून रिक्त पदे ५६५ आहेत. सदर रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. दरम्यान रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने व रिक्त पदाचा कार्यभार अन्य कर्मचाऱ्यांना देवून रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत. शासनाच्या निकषानुसार जनतेला आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.
(३) अंशत: खरे आहे.

रुग्णांना अधिकचे उपचार द्यावयाचे असल्यास पुढील उपचारांसाठी ठाणे किंवा मुंबई येथे रुग्णांना संदर्भित

करण्यात येते.  तथापि ठाणे किंवा मुंबई येथे जाण्यापेक्षा अंतर कमी असल्यामुळे रुग्णांना तलासरी, डहाणू, जव्हार येथील रुग्णांना नाशिक, गुजरात राज्यातील बलसाड किंवा केंद्रशासित सिल्वासा येथील विनोबा भावे रुग्णालयाकडे उपचार घेणे सोईचे होते.

(४) हे खरे नाही.

श्रीमती रुपाली भाऊ रोज, वय ४० वर्ष, ह्या मातेचा प्रसुतीची अपेक्षित तारीख २७/०२/२०२४ होती.  सदर मातेची एकूण ४ वेळा आरोग्य तपासणी करण्यात आली.  तसेच सदर मातेच्या दि. ०५/१०/२०२३ व दि. ०६.१२.२०२३ रोजी २ सोनोग्राफी करण्यात आल्या होत्या.  आरोग्य सेविका यांच्या गृह भेटीदरम्यान तपासणीमध्ये हिमोग्लोबिन ८.७ gm% आढळून आल्याने प्रा.आ.केंद्रात उपचाराचा सल्ला देण्यात आला.  सदर प्रा.आ.केंद्रातील तपासणीनंतर तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी ग्रामीण रुग्णलयात संदर्भित करण्याचा सल्ला दिला.  सदर माता दि. १५.०१.२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता ग्रामीण रुग्णालय मोखाडा येथे दाखल झाली.  त्यावेळी तिला डोकेदुखी, उलटी, पोटदुखी, लघवीचे प्रमाण कमी हा त्रास होता.  तपासणी केली असता BP= १४०/८० mm of Hg. Pulse = १२०/min तसेच Ictrus++, Abdominal wall Edema ++ ही आढळून आले.  तसेच स्त्री रोगतत्र यांनी  A primigravida with ३४ weeks IUFD with HELLP syndrome Early ARF असे निदान करुन दि. १५.०१.२०२४ रोजी दुपारी १२ वाजता पुढील  उपचारासाठी सिव्हील हॉस्पीटल नाशिक येथे संदर्भित केले.

सिव्हील हॉस्पीटल,नाशिक येथे दि. १५.१.२०२४ रोजी Emergency  LSCS करण्यात आले.  बाळाचा उपजात मृत्यू झालेला होता.  त्यानंतर सदर माता ही नाशिक सिव्हील हॉस्पीटल येथे ICU येथे ॲडमिट होती.  ५ व्या दिवशी दि. १९.१.२०२४ रोजी उपचार सुरु असताना सदर मातेचा मृत्यू झाला.  सिव्हील हॉस्पीटल नाशिक येथील मृत्यूच्या कारणाच्या अहवाला नुसार सदर मातेचा मृत्यू BILATERAL PNEUMONITIS WITH CHRONIC LIVER DESEASE WITH CEREBRAL OMEDEMA या कारणामुळे झाल्याचे दिसून येते.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुष्ठरोगाचे पूर्णत: निर्मूलन करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(१८) * ८०७३५  श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुष्ठरोगासंदर्भात आजही पूर्णत: जनजागृती झाली नसून कुष्ठरोग रुग्णांच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिनांक  २६ मार्च, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य सेवा, कुष्ठरोग आणि क्षयरोग विभागाकडून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार राज्यात सन  २०२१-२०२२ मध्ये  १४ हजार ५२० , सन २०२२-२०२३ मध्ये  १९ हजार ८६० तर सन २०२३-२०२४ च्या डिसेंबरपर्यंत २० हजार कुष्ठरुग्णांच्या नोंदी आढळून आल्या असून कुष्ठरुग्णांचे प्रमाण हे सातत्याने वाढताना दिसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त आकडेवारी पाहता कुष्ठरोग नियंत्रणात आणण्यात शासनाला अपयश येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कुष्ठरोगाचे पूर्णत: निर्मूलन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे,

कुष्ठरोग रुग्णांच्या संख्येत अल्प प्रमाणात वाढ झाली आहे.

(२) हे अंशतः खरे आहे,

राज्यात सन २०२१-२२ मध्ये १४५२०, सन २०२२-२३ मध्ये १९८६०, तसेच सन २०२३-२४ (डिसेंबर अखेर) १७०४८ नवीन कुष्ठरुग्ण आढळले आहेत.

(३) हे खरे नाही,

(४) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाअंतर्गत केंद्र सरकारने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना व राज्यस्तरावरील नाविन्यपूर्ण योजनेच्या माध्यमातून समाजातील सर्व कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित औषधोपचाराखाली आणले जाते. कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावरुन व जिल्हास्तरावरुन कार्यक्षेत्रामध्ये नियमितपणे संनियंत्रण केले जाते.

कुष्ठरोगाचे निर्मुलनासाठी कार्यक्षेत्रात खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

उपाययोजना-

• विविध माध्यमांव्दारे जनसामान्यांपर्यंत कुष्ठरोगाबाबतची शास्त्रोक्त माहिती देऊन कुष्ठरोगाच्या तपासणीसाठी स्वतःहून पुढे येण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

• दरवर्षी २६ जानेवारी रोजी व ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीमध्ये महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान राबविण्यात येते. हा उपक्रम राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये राबवून कुष्ठरोगाबाबत व्यापक जनजागृती करण्यात येते.

• शहरी भागात अवैद्यकीय सहाय्यक व ग्रामीण भागात आरोग्य कर्मचारी, आशा यांच्यामार्फत संशयित रुग्ण शोधण्यात येतात. निदाननिश्चिती झालेनंतर त्वरीत बहुविध औषधोपचार दिला जातो.

• नवीन शोधलेल्या सर्व कुष्ठरुग्णांच्या सर्व सहवासितांची तपासणी केली जाते. सहवासितांमध्ये कुष्ठरोगाचा प्रसार होऊ नये याकरिता प्रतिबंधक उपाय म्हणून सर्व पात्र सहवासितांना वजनानुसार रिफांम्पीसीन या गोळीची एक मात्रा दिली जाते.

• शाळेतील विद्यार्थ्यांना कुष्ठरोगविषयक आरोग्य शिक्षण दिले जाते व त्यांची कुष्ठरोग संशयितांसाठी तपासणी केली जाते.

• सन २०१६-१७ पासून दरवर्षी राज्यात "कुष्ठरुग्ण शोध मोहीम" राबविण्यात येते. या मोहीमेमध्ये आढळून आलेल्या कुष्ठरुग्णांना मोफत बहुविध औषधोपचार देण्यात येतो.

• कुष्ठरोग तपासणी पासून वंचित असण्याची शक्यता असल्यामुळे जोखमीचा घटक असलेल्या खाणकामगार, कारागृहातील व्यक्ती, आश्रमशाळा, वीटभट्टी कामगार, बांधकाम कामगार, विस्थापित लोकसंख्या इ. यासारख्या जोखमीच्या भागातील लोकसंख्येचे "कुसुम" कार्यक्रमाअंतर्गत कुष्ठरोग कार्यक्रमातील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत सर्वेक्षण करण्यात आले व त्यामध्ये ८४९ नवीन कुष्ठरुग्ण शोधून त्यांना तात्काळ औषधोपचार सुरु करण्यात आला आहे.

• हयात असलेल्या सर्व नव्या व जुन्या कुष्ठरुग्णांच्या घरी भेट देऊन कुष्ठरोग कार्यक्रमातील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत एकूण ७,७७,३८७ सहवासितांची तपासणी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर,२०२३ मध्ये करण्यात

आली, त्यामध्ये ९८१ नवीन कुष्ठरुग्ण शोधण्यात आले. नवीन कुष्ठरुग्णांना त्वरीत औषधोपचार सुरु करण्यात आला.

• समाजातील १०० टक्के कुष्ठरुग्ण शोधून त्यांना त्वरीत उपचाराखाली आणण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविल्यामुळे सन २०२३-२४ मध्ये २०००१ कुष्ठरुग्ण शोधण्यात राज्याला यश आले आहे. कुष्ठरुग्णांना बहुविध औषधोपचार व सहवासितांना पी.ई.पी (प्रतिबंधात्मक औषधोपचार) उपाय दिल्यामुळे कुष्ठरुग्ण संसर्गाची साखळी खंडीत होण्यास व कुष्ठरोग निर्मूलनाचे ध्येय साध्य करण्यास मदत होत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयात रुग्णाचा उंदीराने चावा घेतल्याने झालेला मृत्यू

**(१९) * ८०१५० श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार घेत असलेले श्री. सागर रेणुसे या तीस वर्षीय रुग्णास उंदीर चावल्यामुळे त्याची प्रकृती खालवल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे दिनांक २ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्याकरिता रुग्णालयाच्या प्रशासनाकडून समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी समितीच्या अहवालाअंती सदर प्रकरणात दोषींवर कारवाई करणेसह रुग्णालयातील स्वच्छता राखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार घेत असलेले श्री.सागर रेणुसे या तीस वर्षीय रुग्णाचा उपचारा दरम्यान मृत्यू झालेला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर घटनेची चौकशी करण्याकरीता संचालनालयाच्या स्तरावरुन गठीत केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार अतिदक्षता विभागात उंदरांचा प्रादुर्भाव असल्याचे परिस्थितीजन्य पुरावे आढळून आले असल्याने खबरदारी म्हणून डॉ.अजय तावरे यांच्याकडील वैद्यकीय अधिक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार काढुन घेण्यात आला व त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच अधिष्ठाता, बै.जी.शा.वै.म., पुणे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच स्वच्छता निरीक्षक व अधिपरिचारिका या पदावरील कर्मचाऱ्यांची देखील विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

रुग्णालय व रुग्णालयाच्या परिसरातील दैनंदिन स्वच्छता वर्ग-४ कर्मचाऱ्यांकडून स्वच्छता निरीक्षक यांचेमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयात अंगणवाडी साहित्य पुरवठयाची देयके अदा करणेबाबत

**(२०) * ७९८२६ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद, नागपूर येथील महिला व बालविकास विभागाने अंगणवाडया अद्ययावत करण्यासंदर्भात केंद्र शासनाकडून १ कोटी ६ लाख रुपयांचा निधी देण्यात आला असल्याने कामाचे कंत्राट दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला व बालविकास विभागाने या कामी नियुक्त कंत्राटदाराकडून साहित्याचा पुरवठा न होताच ९८ लाख रुपयांची देयके कंत्राटदाराला अदा केल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वास्तविक कंत्राटदाराने मागणीप्रमाणे साहित्याचा पुरवठा केल्याची खात्री केल्यानंतरच देयके अदा करण्याचे आदेश विभागाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, साहित्य पुरवठा न करताच देयके अदा करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित कंत्राटदार व यास जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.

अंगणवाडी श्रेणीवर्धनाकरिता प्रति अंगणवाडी रु. २ लक्ष प्रमाणे ४९ अंगणवाडी केंद्रांकरिता रु. ९८.०० लाख तसेच अंगणवाडी इमारत देखभाल व दुरुस्तीकरिता प्रति अंगणवाडी रुपये ३०००/- प्रमाणे २७१ अंगणवाडी केंद्रांकरिता रुपये ८.१३ लाख अशा प्रकारे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात केंद्र व राज्य हिश्याचा एकूण रु. १०६.१३ लाख इतका निधी एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयामार्फत जिल्हा परिषद, नागपूर यांना वितरीत करण्यात आला होता.

सदरचा निधी जिल्हा कार्यक्रम अधिकारी (म. बा. वि.), जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांचे अधिनस्त १३ बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना उपलब्ध करून दिला होता. त्यानुसार अंगणवाडी श्रेणीवर्धनाकरिता आवश्यक साहित्यांची खरेदी प्रक्रिया संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावरून करण्यात आली.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्हा परिषदे अंतर्गत १३ बाल विकास प्रकल्प कार्यालयांपैकी नागपूर (ग्रामीण) या एका बाल विकास प्रकल्प कार्यालयाने अंगणवाडी केंद्राचे साहित्य प्रत्यक्षात प्राप्त होण्यापूर्वी संबंधित पुरवठाधारकास त्याचे देयक अदा केल्याचे दिसून येते.

उर्वरित १२ बाल विकास प्रकल्पांचे साहित्याचा प्रत्यक्षात पुरवठा झाल्यानंतर संबंधित पुरवठाधारकास देयके अदा करण्यात आली आहेत.

(५) नागपूर जिल्हा परिषदेमार्फत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीने जिल्हा परिषद अंतर्गत सर्व बाल विकास प्रकल्पांची याप्रकरणी चौकशी केली. त्यानुषंगाने संबंधित प्रकल्पांच्या जबाबदार प्रभारी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच, याप्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अंधेरी (पश्चिम) येथील भूखंडावर उद्योग भवनाचे बांधकाम करणेबाबत

**(२१) * ७९४८२ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पश्चिम) येथील शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय कामगारांच्या घरांसाठी देण्यात आलेल्या भूखंडावर उद्योग भवन उभारण्याच्या नावाखाली हबटाऊन विकासकाला मोक्याचा भूखंड प्रति एक रुपया चौरस फुटाने वितरित करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नऊ वर्षांचा कालावधी होऊनही त्या जागेवर अतिक्रमण असल्याचे कारण देवून उद्योग भवनाचे बांधकाम विकासकाकडून करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विकासकामार्फत खुल्या बाजारात विक्री करावयाच्या तीन टॉवर्सचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन उद्योग भवनाचे बांधकाम करणेबाबत तसेच संबंधित विकासक व दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण** (१) होय, हे अंशत : खरे आहे.

विषयांकित प्रकल्पास दि.०५/०८/२००८ रोजीच्या मंत्रिमंडळ पायाभूत समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार मंजुरी प्राप्त असून खुल्या निविदेद्वारे विकासकातर्फे देकार मागविण्यात आले असून मे.आकृती सिटी लि.मुंबई (सद्याचे नाव मे.हबटाऊन प्रा.लि.) या विकासकाच्या निविदेस शासनाकडून मंजुरी प्राप्त झाली आहे.दि.०१/११/२००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार अंधेरी (प),आंबिवली येथील नगर भुमापन क्र.१४१ (अ) या भूखंडाच्या एकूण १८,७८५ चौ. मी. क्षेत्रफळापैकी १४,२७० चौ. मी. हा भूखंड विकासकास प्रथम ३० वर्षाच्या कालावधी करता रुपये १/- प्रती चौ.मी.प्रति वर्ष याप्रमाणे भाडेपट्ट्यावर देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे व पुढे हा कालावधी ३०/३०/९ वर्षासाठी त्यावेळी अस्तित्वात असलेल्या महसूल व वन विभागाच्या याबाबतच्या धोरणानुसार नूतनीकरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.

सदर प्रकल्प हा अंधेरी (प.) आंबिवली सर्व्हे क्र.१४१ (अ) येथे उद्योगभवन व चुनाभट्टी येथील न.भू.क्र.६२७ येथे शासकीय निवासस्थाने (३ इमारती एकूण २४० निवासस्थाने) बांधणे इ.कामे अंतर्भूत आहेत.

सध्यस्थितीत, अंधेरी (प) आंबिवली सर्व्हे क्र. १४१ (अ) येथील भुखंडावर उद्योग भवन इमारतीचे ७ व्या मजल्याचे आर.सी.सी.काम प्रगतीपथावर आहे.

तसेच,चुनाभट्टी येथील निवासी इमारत क्र.१ व ३ चे बांधकाम पूर्ण झालेले आहे व सदर इमारती उद्योग विभागामार्फत वापरात आहेत. तसेच, इमारत क्र.२ चे बांधकाम ८०% काम पूर्ण झाले आहे.
(३) हे खरे नाही.
तीन टॉवर्सचे बांधकाम पूर्ण झालेले नसून सदरची कामे प्रगतीत आहे.(४७.५% काम पूर्ण झाले आहे).
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बाल संगोपन योजनेंतर्गत मिळणारे अनुदान तात्काळ उपलब्ध करणेबाबत

**(२२) * ७९९३० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली),**

**श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला व बालकल्याण विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या बाल संगोपन योजनेअंतर्गत अनाथ बालकांना दरमहा रु.२२५० इतके अनुदान वितरित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये या योजनेंतर्गत देण्यात येणारे अनुदान मोठया प्रमाणात अप्राप्त तसेच प्रलंबित असून काही ठिकाणी रक्कम थेट बँक खात्यात जमा होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानाअभावी निराधार बालकांना शिक्षणासोबत इतरही खर्च भागविण्यात मोठया प्रमाणात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी अनेक लोकप्रतिनिधींनी सदर अनुदान तातडीने वितरीत करणेबाबत शासनाकडे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अनुदान तात्काळ वितरीत करणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही,

सन २०२३-२४ या वित्तीय वर्षातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेच्या लाभार्थ्यांना पहिल्या सहामाहीचा लाभ देण्यासाठी दिनांक २५ जुलै, २०२३ अन्वये रुपये ५४.८४ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला होता. तसेच शासन निर्णय दि.०१.०३.२०२४ अन्वये ₹ ९५.२९ कोटी आणि शासन निर्णय दि.२८.०३.२०२४ अन्वये ₹४०.८४ कोटी इतका निधी अनुदान अदा करण्यासाठी वितरीत करण्यात आला आहे. लाभाची रक्कम वितरीत होण्यास होणार विलंब टाळण्यासाठी सन २०२३-२४ या वित्तीय वर्षापासून सदर योजनेचा लाभ आयुक्तालय स्तरावरुन थेट बालकाच्या बँक खात्यामध्ये जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी सर्व लाभार्थ्यांची माहिती एकत्रित करण्यात आलेली आहे. परंतू काही जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या माहितीमध्ये बँकेचा चुकीचा IFSC, MICR कोड, बालकांच्या नावामधील स्पेलिंगमुळे नावांतील तफावत, अर्धवट बँक खाते क्रमांक अशा तफावती होत्या. तसेच अनेक लाभार्थ्यांचे बँक खाती बंद होती, लाभार्थ्यांचे कुटुंबाने इतरत्र स्थलांतर केल्याने त्या लाभार्थ्याची माहिती प्राप्त करुन घेण्यास अडचणी येत होत्या. अशा अनेक कारणांमुळे लाभाची रक्कम लाभार्थ्याच्या खात्यामध्ये जमा करण्यास अडथळे येत होते. तथापि, संबंधित जिल्ह्याकडून लाभार्थ्यांची अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेऊन मार्च, २०२४ अखेर एकूण १,०३,४९३ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर ₹ १८९.५ कोटी इतकी लाभाची रक्कम जमा करण्यात आली आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्यासाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणींवर मात करुन अनुदान वितरीत करण्यात आले असल्यामुळे चौकशीची आवश्यकता नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मानखुर्द, मुंबई येथील बालसुधारगृहाच्या आखत्यारीतील जागेवर होत असलेल्या अवैध बांधकामाबाबत**

**(२३) * ७९४२२ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द, मुंबई येथील बालसुधारगृहाच्या बाजूला असलेल्या २३ एकर शासकीय जमीनीवर भूमाफिया, खाजगी व्यावयिक व झोपडपट्टीधारक यांचेकडून मोठया प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालसुधारगृहाच्या संस्थेच्या प्रवेशद्वारा पासून ५० मीटर अंतरावर बार ॲन्ड रेस्टॉरंट व अन्य व्यवसाय अनधिकृतपणे सुरू असून त्या जागेवर झोपडयांची परस्पर विक्री देखील होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अतिक्रमणाविरोधात प्राचार्य, चिल्ड्रेन्स एड सोसायटी, मुंबई यांनी दिनांक ६ एप्रिल, २०२४ रोजी वा त्या सुमारास पोलिसांत तक्रार नोंद केली असता त्यांच्यावर हल्ला करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सदर भूखंड अतिक्रमणमुक्त करणेबाबत तसेच संबंधित दोषींवर व जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे,

दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, मुंबई संचलित औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मानखुर्द येथील प्राचार्य यांनी अतिक्रमणा विरोधात तक्रार केली हे खरे आहे. तथापि, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मानखुर्द येथील परिसरात गर्दुल्यांना हटकल्यामुळे त्यांनी प्राचार्यांवर हल्ला केला होता.

(४) संबंधित अतिक्रमण धारकाविरोधात स्थानिक गोवंडी पोलीस ठाणे येथे दि.६.४.२०२४ रोजी एफ.आय.आर. दाखल केले असून जागेच्या संरक्षणासाठी खाजगी सुरक्षा रक्षक पुरविण्यात आले आहेत. सदर अतिक्रमण हटविण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना अर्धशासकीय पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. याशिवाय दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, मुंबई संस्थेच्या मानखुर्द येथील जागेभोवती संरक्षक भिंत व तारेचे कुंपण बांधण्याच्या कामाबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(२४) * ७९६०१ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.विनोद**

**निकोले (डहाणू), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या मानधन, सुविधा तसेच इतर मागण्या शासनस्तरावर अद्यापही प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ग्रामीण आदिवासी व शहरी भागात सुमारे २ लाख अंगणवाडी सेविका, मदतनीस याचे मानधन प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी सेविकांनी आपल्या न्याय हक्कांसाठी दिनांक ३ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील आझाद मैदानामध्ये मोर्चा काढून आंदोलन केलेले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंगणवाडी सेविकांच्या विविध प्रलंबित मागण्या तसेच थकित मानधन वेळेवर अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) राज्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचेकडून करण्यात येणाऱ्या विविध मागण्यांबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.

(२) हे खरे आहे.

राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे माहे मार्च, २०२४ चे मानधन दिनांक २२.४.२०२४ रोजी अदा करण्यात आले आहे. त्यानंतर माहे एप्रिल व मे, २०२४ या महिन्यांचे मानधन देखील अदा करण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत त्यांच्या संघटनासमवेत बैठक आयोजित करुन कार्यवाही करण्यात येते. तद्नुषंगाने दिनांक २५.१.२०२४ रोजी झालेल्या बैठकीनुसार अंगणवाडी कर्मचारी संघटना यांनी आंदोलन मागे घेतले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (पूर्व) (जि. ठाणे) येथील 'हॅप्पी किड्स डे केअर सेंटर' मध्ये लहान मुलांचा केंद्र चालकांकडून करण्यात आलेला छळ

**(२५) * ८०२९२ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (पूर्व) (जि. ठाणे) येथील फडके रोडवरील "हॅपी किडस डे केअर सेंटर" येथे केंद्र चालकांकडून लहान मुलांचा छळ होत असल्याचे दिनांक २० मार्च, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केंद्रात मुलांना बांधून ठेवणे, उलटे करुन टांगणे, मारहाण करणे, भिती दाखविणे असे प्रकार केंद्र चालकांकडून केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी स्थानिक, सामाजिक कार्यकर्ते व राजकीय पक्षाचे कार्यकर्ते तसेच मुलांचे पालक यांनी रामनगर पोलीस ठाणे येथे केंद्र चालक व तेथील महिला कर्मचाऱ्यांविरुध्द तक्रार दाखल करण्यास गेले असता त्यास नकार देणे, वरिष्ठांकडून याबाबत आदेश आल्यानंतर मात्र तक्रार दाखल करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, पाळणा घरातील सुविधा व सुरक्षिततेबाबत केंद्र शासनाने नवी मानके (Guide Lines) लागू केली असून राज्य प्रशासनाकडून त्याची अंमलबजावणी होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित सेंटरच्या केंद्र चालक व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) तसेच राज्यात लहान मुलांचा सांभाळ करणाऱ्या केंद्रांमध्ये मुलांच्या सुरक्षिततेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.

सदर बाब दिनांक १८.३.२०२४ रोजी निदर्शनास आली आहे.

(२), (३), (४), (५) व (६) सदर प्रकरणी डे केअर सेंटरच्या लाभार्थींच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १९.०३.२०२४ रोजी (१८.३२ वाजता) FIR No. ०३५२ नुसार “हॅप्पी किडस डे केअर” फ़डके रोड, डोंबिवली पूर्व जि. ठाणे हे सेंटर चालविणाऱ्याविरूध्द डोंबिवली पोलीस स्टेशन जि. ठाणे या ठिकाणी भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३२४, ३४ व अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ चे कलम ७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार त्यांची मुलगी गार्गी मंदार ओगले वय ३ वर्षे हिला लाकडी काठीने मारहाण करुन फरफटत नेऊन मारहाण करीत असल्याबाबत तक्रार दिलेली आहे.

खाजगी संस्थांच्या पाळणाघरांबाबत केंद्र शासनाच्या दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल. त्याचप्रमाणे शासनामार्फत Anganwadi Cum Creches सुरु करण्यात येत आहेत.

-----------------

## राज्य कामगार विमा योजनेंतर्गत असलेली रुग्णालये प्रभावी व सक्षमपणे चालविण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना

**(२६) * ७९८०२ श्री.विनोद निकोले (डहाणू), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कामगार विमा योजनेंतर्गत १२ रुग्णालये १०८ दवाखाने असून २३ जिल्ह्यांमधील २१६ खाजगी रुग्णालयाबरोबर संलग्नता योजनेंतर्गत रुग्णांवर उपचार केले जातात, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईत अंधेरी, वरळी, मुलुंड सारख्या ठिकाणी कामगार रुग्णालये असूनही तेथे पुरेशा वैद्यकीय सुविधा मिळत नसून खाटांच्या संख्येत देखील वाढ करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून ही रुग्णालये राज्य कामगार विमा सोसायटीमार्फत चालविणे शक्य नसून उपचारांचा सविस्तर आढावा घेतल्यानंतर ही रुग्णालये आरोग्य विभागाअंतर्गत चालविण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मा.आरोग्य मंत्री यांनी माहे मार्च, २०२४ मध्ये दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील कामगार रुग्णालये प्रभावी व सक्षमपणे चालविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे,

राज्य कामगार विमा योजनेंतर्गत राज्यात १२ रुग्णालये १०८ दवाखाने कार्यरत असून, नव्याने राज्य कामगार विमा योजना लागू झालेल्या क्षेत्रांमध्ये व ज्या ठिकाणी राज्य कामगार विमा योजना रूग्णालयांमध्ये पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत, अशा एकूण ३४ जिल्ह्यांमध्ये secondary medical care पुरविण्या करीता १९५ खाजगी रूग्णालयां सोबत टाय-अप करण्यात आलेले आहे.
(२) हे अंशत :खरे आहे.

राज्य कामगार विमा योजना रूग्णालय, अंधेरी हे केंद्र शासनामार्फत चालविण्यात येत असून, सदर रूग्णालयाच्या अंतर्गत दुरूस्ती व नुतनीकरणाचे काम सुरू असल्यामुळे त्या ठिकाणी अद्याप आंतररूग्ण सेवा सुरू करण्यात आलेली नाही.

तर, वरळी व मुलुंड येथील राज्य कामगार विमा योजना रूग्णालय हे राज्य शासनामार्फत चालविण्यात येत असून, त्याठिकाणी विमारुग्णांना पुरेशा वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. परंतु, सदर दोन्ही रूग्णालयांच्या इमारती ५५ ते ६० वर्षे जुन्या होऊन मोडकळीस आलेल्या आहेत. सदर दोन्ही इमारतींचे पुर्नबांधकाम करण्याचे नियोजित असल्याने तेथील खाटांच्या संख्येत वाढ करण्यात आलेली नाही.
(३) हे अंशत :खरे आहे.
(४) राकावियो रूग्णालय, वरळी व मुलुंड हे राज्य शासनाच्या मालकीचे असून, राज्यातील नोंदणीकृत विमाधारकांची वर्गणी ही थेट केंद्र शासनाकडे जमा होत असल्याने सदर दोन्ही रूग्णालयाच्या पुर्नविकासासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देण्याची केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली होती .त्यावर केंद्र शासनाने सदर दोन्ही रूग्णालयांचा पुर्नविकास करण्यास संमती दर्शविली आहे .राकावियो रूग्णालय, मुलुंड येथे राकावि महामंडळाचे वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय स्थापित करण्याचे देखील प्रस्तावित आहे .सदरील दोन्ही रूग्णालयांच्या पुर्नविकासाकरीता राज्य शासनाची जागा केंद्रशासनास हस्तांतरीत करावी, की दोन्ही रूग्णालयांचे पुर्नविकास हा राज्य शासनाच्या स्वनिधीतून करावा, याबाबतचा निर्णय नियामक मंडळामार्फत शासन स्तरावरुन घेण्यात आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

उर्वरीत राकावियो रुग्णालयांत व राकावि दवाखान्यांत महा-राकावि सोसायटी मार्फत secondary medical care करीता १९५ व राकावि महामंडळाकडून superspecility treatment करीता १४५ खाजगी रुग्णालयांशी टाय-अप करुन विमारुग्णांना वैद्यकीय सेवा सुरळीतपणे पुरविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पुलगाव (जि.वर्धा ) येथील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर मद्यपान करून आल्याबाबत

**(२७) * ७९५९३ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुलगाव (जि.वर्धा) येथील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर उपलब्ध नसल्याने रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांनी वर्धा येथून दोन डॉक्टरांना रुग्णालयात जाण्यास सांगितले असता ते दोन्ही डॉक्टर मद्यधुंद अवस्थेत ग्रामीण रुग्णालयात आल्याचे दिनांक २४ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार संबधित डॉक्टरांवर कारवाई करणेसह राज्यातील इतर रुग्णालयात असे प्रकार घडू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) संबंधित वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रविण धमाने व डॉ. माणिकलाल राऊत हे ज्या कारमध्ये शासकीय संस्थेच्या आवारात बसून होते त्या कारमध्ये मद्याची शिशी बाळगणे हे कार्यालयीन शिस्तीस धरून नसल्याने संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा(वर्तणुक) नियम, १९७९ मधील तरतुदींचे सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी कटाक्षाने पालन करणे बंधनकारक असून त्या तरतुदींचा भंग केल्यास संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा(वर्तणुक) नियम, १९७९ व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.